भारत सरकार

**विधि व न्याय मंत्रालय**

सत्यमेव जयते

# सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८९७

**(सन १८९७ चा अधिनियम क्रमांक १०)**

[२६ फेब्रुवारी, २००४ रोजी यथाविद्यमान]

# The General Clauses Act, 1897

**(Act No. 10 of 1897)**

*[As in force on the 26th February, 2004]*

संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन मुंबई ४०० ००४
यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

२००७

**[किंमत :** रुपये १६.००**]**

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक २६ फेब्रुवारी, २००४ रोजी यथाविद्यमान असलेला दि जनरल क्लॉजेस ॲक्ट, १८९७ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे **राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १३, अंक २, दिनांक १४ ऑक्टोबर, २००४ यात पृष्ठ ५१ ते ६३ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली.
दिनांक १४ ऑक्टोबर, २००४

टी. के. विश्वनाथन,
सचिव, भारत सरकार,

## PREFACE

**This edition of the General Clauses Act, 1897 as on the 26th February, 2004 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette* of India, Extraordinary, Part XII, Section 1, No. 2, Vol. 13, dated 14th October, 2004 on pages 51 to 63.**

**This authoritative text was published under the authority of the President under section 2 clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.**

**New Delhi.**
**Date 14th October, 2004**

T. K. VISWANATHAN,
Secretary to the Government of India.

## विशोधन अधिनियम व अनुकूलन आदेश यांची सूची

१. निरसन आणि विशोधन अधिनियम, १९०३ (१९०३ चा अधिनियम क्रमांक १).

२. निरसन आणि विशोधन अधिनियम, १९१४ (१९१४ चा अधिनियम क्रमांक १०).

३. १९१४ चा अधिनियम क्रमांक १७.

४. १९१९ चा अधिनियम क्रमांक १८.

५. १९२० चा अधिनियम क्रमांक ३१.

६. १९२३ चा अधिनियम क्रमांक २.

७. १९२८ चा अधिनियम क्रमांक २८.

८. १९३६ चा अधिनियम क्रमांक १९.

९. विधि अनुकूलन आदेश, १९३७.

१०. अनुकूलन आदेश, १९४७.

११. विधि अनुकूलन आदेश, १९५०.

१२. विधि अनुकूलन (विशोधन) आदेश, १९५०.

१३. विधि अनुकूलन (क्रमांक १) आदेश, १९५६.

१४. विधि अनुकूलन (विशोधन) आदेश, १९६०.

## सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८९७

### कलमांचा क्रम

कलमे

### प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव.

२. [निरसित].

### सर्वसाधारण व्याख्या

३. व्याख्या.

४. मागील व्याख्या, पूर्वीच्या अधिनियमितींना लागू असणे.

४क. विवक्षित व्याख्या भारतीय विधींना लागू असणे.

### अर्थ लावण्याचे सर्वसाधारण नियम

५. अधिनियमिती प्रवर्तित होणे.

५क. [निरसित].

६. निरसनांचा परिणाम.

६क. अधिनियमातील किंवा विनियमातील पाठात विशोधन करणाऱ्या अधिनियमाचे निरसन.

७. निरसित अधिनियमितींचे पुनरुज्जीवन.

८. निरसित अधिनियमितींच्या निर्देशांचा अर्थ लावणे.

९. कालावधीचा प्रारंभ व समाप्ती.

१०. कालगणना.

११. अंतराची मोजणी.

१२. अधिनियमितीमध्ये शुल्क यथाप्रमाण असल्याचे समजणे.

१३. लिंग आणि संख्या.

१३क. [निरसित].

### अधिकार आणि कार्याधिकारी

१४. प्रदान केलेले अधिकार वेळोवेळी वापरणे.

१५. नियुक्त करण्याच्या अधिकारामध्ये पदाधिकारपरत्वे नियुक्त करण्याच्या अधिकाराचा समावेश असणे.

१६. नियुक्त करण्याच्या अधिकारामध्ये निलंबित करण्याच्या किंवा पदच्युत करण्याच्या अधिकाराचा समावेश असणे.

१७. कार्याधिकाऱ्यांचे प्रतिनिधान.

१८. उत्तराधिकारी.

१९. कार्यालयीन मुख्याधिकारी आणि दुय्यम कर्मचारी.

### अधिनियमितीखाली केलेले आदेश, नियम, इत्यादींच्या संबंधातील उपबंध

२०. अधिनियमितीखाली पुरःसृत केलेले आदेश, इत्यादींचा अर्थ लावणे.

२१. अधिसूचना, आदेश, नियम किंवा उपविधि पुरःसृत करण्याच्या अधिकारामध्ये, त्यात भर घालण्याच्या, विशोधन करण्याच्या, बदल करण्याच्या किंवा ते विखंडित करण्याच्या अधिकारांचा समावेश असणे.

२२. अधिनियमिती पारित होणे व तिचा प्रारंभ होणे यांच्या दरम्यान नियम किंवा उपविधि करणे व आदेश पुरःसृत करणे.

२३. नियम किंवा उपविधि आधी प्रकाशित करून मग पुरःसृत करण्याबाबत लागू असलेले उपबंध.

२४. निरसित करून पुन्हा अधिनियमित केलेल्या अधिनियमितीखाली पुरःसृत केलेले आदेश, इत्यादी चालू राहणे.

**संकीर्ण**

२५. द्रव्यदंडाची वसुली.

२६. दोन किंवा त्याहून जास्त अधिनियमितींखाली शिक्षापात्र असलेल्या अपराधांबाबत उपबंध.

२७. डाकेने बजावणी याचा अर्थ.

२८. अधिनियमितीचा उल्लेख करणे.

२९. पूर्वीच्या अधिनियमिती, नियम आणि उपविधि यांचे संरक्षण.

३०. अध्यादेशांना अधिनियम लागू असणे.

३०क. [निरसित].

३१. [निरसित].

**अनुसूची** [निरसित].

# सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८९७

**(१८९७ चा [१] अधिनियम क्रमांक १०)**

(२६ फेब्रुवारी, २००४ रोजी यथाविद्यमान)

[११ मार्च, १८९७]

**सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८६८ आणि १८८७ हे संकलित आणि विस्तारित करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी** सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८६८ (१८६८ चा १) आणि १८८७ (१८८७ चा १) हे संकलित आणि विस्तारित करणे समयोचित आहे, **त्याअर्थी,** याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

## प्रारंभिक

**१.** (१) या अधिनियमाला "सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८९७" असे म्हणता येईल ; [२]* * * **संक्षिप्त नाव.**

[३]* * * * * *

**२.** [निरसित] निरसन आणि विशोधन अधिनियम, १९०३ (१९०३ चा १) कलम ४ आणि अनुसूची तीन यांद्वारे निरसित.

## सर्वसाधारण व्याख्या

[३]**[३.** या अधिनियमामध्ये आणि या अधिनियमाच्या प्रारंभानंतर केल्या जाणाऱ्या सर्व केंद्रीय अधिनियमांमध्ये व विनियमांमध्ये, विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसेल तर,— **व्याख्या.**

(१) "अपप्रेरणा देणे" याला त्याचे व्याकरणिक रूपभेद आणि सजातीय शब्दप्रयोग यांसह, "भारतीय दंड संहिता" (१८६० चा ४५) यात असलेलाच अर्थ राहील ;

(२) "कृती" हा शब्द एखाद्या अपराधाला किंवा दिवाणी अपकृतीला अनुलक्षून वापरला असताना त्यात कृतींच्या मालिकेचा समावेश होईल, आणि जे शब्द केलेल्या कृतींचा निर्देश करतात त्यांच्या व्याप्तीत अवैध अकृतीदेखील येतात ;

(३) "प्रतिज्ञालेख" यात, शपथ घेण्याऐवजी दृढकथन किंवा अधिकथन करण्यास विधिने अनुज्ञात केलेल्या व्यक्तींच्या बाबतीत दृढकथन आणि अधिकथन यांचा समावेश होईल ;

(४) "बॅरिस्टर" याचा अर्थ, इंग्लंडचा किंवा आयर्लंडचा "बॅरिस्टर" किंवा स्कॉटलंडमधील "फॅकल्टी ऑफ ॲडव्होकेटस" चा सदस्य, असा असेल ;

---

१. उद्दिष्टे व कारणे यांचे निवेदन याकरिता पहा, **भारताचे राजपत्र,** १८९७ भाग पाचवा, पृष्ठ ३८, प्रवर समितीचा अहवाल याकरता पहा, वरीलप्रमाणे इंग्रजी पृष्ठ ७७ आणि कौंसिलचे कामकाज

याकरता पहा, वरीलप्रमाणे भाग सहावा, इंग्रजी पृष्ठे ३५, ४०, ५६ व ७६.

"संभाळ परगणे धाराबंदी विनियम, १८७२ (१८७२ चा ३)" याद्वारे संभाळ परगण्यांमध्ये, पंथ पिप्पलोद विधी विनियम, १९२९ (१९२९ चा १) कलम २ द्वारे पंथ पिप्पलोदमध्ये, "खोंडमाळ विधि विनियम, १९३६ (१९३६ चा ४)" कलम ३ व अनुसूचीद्वारे या खोंडमाळ जिल्ह्यात (सध्या ओरिसात असलेला) आणि "अंगुल विधि विनियम, १९३६" (१९३६ चा ५) कलम ३ व अनुसूची याद्वारे अंगुल जिल्ह्यात अधिनियम अंमलात असल्याचे घोषित करण्यात आले आहे. १९३६ चा चौथा विनियम आता ओरिसा अधिनियम (१९६७ चा १९) कलम २ (१५-९-६७) द्वारे निरसित करण्यात आला आहे. अंगुल जिल्हा हा आता ओरिसामधील धेंकनल जिल्ह्याचा उप विभाग आहे.

"वऱ्हाड विधि अधिनियम, १९४१" (१९४१ चा ४) द्वारे वऱ्हाडवर आणि "विलीन संस्थाने (विधि) अधिनियम, १९४९" (१९४९ चा ५९) द्वारे नवीन प्रांतावर व विलीन संस्थानांवर या अधिनियमाचा विस्तार करण्यात आला आहे. आसाममध्ये "आसाम कमिशनरांच्या अधिकारांचे वितरण अधिनियम, १९३९ (१९३९ चा आसाम अधिनियम १)" याद्वारे तो विशोधित करण्यात आला आहे.

२. निरसन आणि विशोधन अधिनियम, १९१४ (१९१४ चा १०), कलम ३ व अनुसूची दोन यांद्वारे पोटकलम (१) च्या अखेरीचा "आणि" हा शब्द व संपूर्ण पोटकलम (२) निरसित करण्यात आले.

३. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे पूर्वीच्या कलमाऐवजी दाखल करण्यात आला.

(५) " ब्रिटिश इंडिया " याचा अर्थ, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट, १९३५ याच्या भाग तीनच्या प्रारंभापूर्वीच्या कालावधीच्या संबंधात हिज मॅजेस्टीच्या डोमिनिअन्समध्ये येणारी जी क्षेत्रे व जी स्थळे त्या त्या काळी हिज मॅजेस्टीकडून भारताच्या गव्हर्नर जनरलमार्फत किंवा भारताच्या गव्हर्नर जनरलला दुय्यम असलेल्या कोणत्याही गव्हर्नरमार्फत किंवा अधिकाऱ्यामार्फत नियंत्रिली जात होती ती सर्व क्षेत्रे व स्थळे, आणि त्या दिनांकानंतरच्या व डोमिनिअन ऑफ इंडियाच्या स्थापना दिनांकापूर्वीच्या कोणत्याही कालावधीसंबंधात, गव्हर्नर-प्रांतामध्ये व चीफ कमिशनर प्रांतामध्ये त्या त्या काळी समाविष्ट असलेली सर्व क्षेत्रे, असा आहे, मात्र गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट, १९३५ याच्या भाग तीनच्या प्रारंभापूर्वी पारित केलेल्या किंवा केलेल्या कोणत्याही भारतीय विधीतील " ब्रिटिश इंडिया " या निर्देशात वऱ्हाडच्या निर्देशाचा समावेश असणार नाही ;

(६) " ब्रिटिशांच्या कब्जातील मुलूख " याचा अर्थ, हिज मॅजेस्टीच्या डोमिनिअन्सपैकी, युनायटेड किंगडम वगळून कोणताही भाग असा असेल, आणि जेथे त्या डोमिनिअन्सचे भाग केंद्रीय आणि स्थानिक अशा दोन्ही विधानमंडळाच्या अधीन असतील तेथे, केंद्रीय विधानमंडळास अधीन असलेले सर्व भाग म्हणजे ब्रिटिशांच्या कब्जातील एक मुलूख होय, असे या व्याख्येच्या प्रयोजनापुरते मानले जाईल ;

(७) " केंद्रीय अधिनियम " याचा अर्थ, संसदेचा अधिनियम, असा असेल आणि त्यात —

(क) डोमिनिअन विधानमंडळाच्या किंवा संविधानाच्या प्रारंभापूर्वी पारित झालेला भारतीय विधानमंडळाचा अधिनियम ; आणि

(ख) अशा प्रारंभापूर्वी गव्हर्नर जनरल-इन कौंसिलने किंवा गव्हर्नर जनरलने विधायी अधिकारात कार्य करताना केलेला अधिनियम,

यांचा समावेश असेल ;

[१][(८) केंद्र सरकार याचा—

(क) संविधानाच्या प्रारंभापूर्वी केल्या गेलेल्या कोणत्याही गोष्टीच्या संबंधात, गव्हर्नर जनरल किंवा, प्रकरणपरत्वे, गव्हर्नर जनरल-इन-कौंसिल, असा अर्थ असेल, आणि त्यात —

(एक) " गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट, १९३५, कलम १२४, पोटकलम (१) खाली एखाद्या प्रांताच्या सरकारकडे सोपविण्यात आलेल्या कार्याच्या संबंधात, त्या पोटकलमाखालील स्वतःला देण्यात आलेल्या प्राधिकाराच्या व्याप्तीमध्ये कार्य करणारे प्रांतिक सरकार ; आणि

(दोन) चीफ कमिशनर प्रांताच्या प्रशासनासंबंधात उक्त अधिनियमाच्या कलम ९४, पोटकलम (३) खाली स्वतःला देण्यात आलेल्या प्राधिकाराच्या व्याप्तीमध्ये कार्य करणारे प्रांतिक सरकार,

यांचा समावेश असेल, आणि

(ख) संविधानाच्या प्रारंभानंतर केल्या गेलेल्या किंवा करावयाच्या कोणत्याही गोष्टीसंबंधात राष्ट्रपती, असा अर्थ असेल आणि त्यात —

(एक) संविधानाच्या अनुच्छेद २५८ च्या खंड (१) खाली एखाद्या राज्याच्या शासनाकडे सोपवण्यात आलेल्या कार्याच्या संबंधात त्या खंडाखाली स्वतःला दिल्या गेलेल्या प्राधिकाराच्या व्याप्तीमध्ये कार्य करणारे ते राज्य शासन ; [२][***]

(दोन) " [३][संविधान (सातवे विशोधन) अधिनियम, १९५६ " यांच्या प्रारंभापूर्वीच्या] भाग ग राज्याच्या प्रशासनासंबंधात, संविधानाच्या अनुच्छेद २३९ खाली किंवा, प्रकरणपरत्वे, अनुच्छेद २४३ खाली स्वतःला देण्यात आलेल्या प्राधिकाराच्या व्याप्तीमध्ये कार्य करणारा चीफ कमिशनर किंवा नायब-राज्यपाल किंवा शेजारील राज्याचे शासन किंवा अन्य प्राधिकरण,] [३][आणि]

[३][(तीन) एखाद्या संघ राज्यक्षेत्राच्या प्रशासनाच्या संबंधात, संविधानाच्या २३९ व्या अनुच्छेदाखाली स्वतःला देण्यात आलेल्या प्राधिकाराच्या व्याप्तीमध्ये कार्य करणारा राज्यक्षेत्राचा प्रशासक],

यांचा समावेश असेल ;

(९) " प्रकरण " याचा अर्थ, त्या अधिनियमाच्या किंवा विनियमाच्या ज्या प्रकरणात तो शब्द येईल ते प्रकरण, असा असेल ;

(१०) " मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकरण " किंवा " मुख्य महसूल प्राधिकरण " याचा —

(क) ज्या राज्यात महसूल मंडळ असेल तेथे ते मंडळ,

(ख) ज्या राज्यात महसूल आयुक्त असेल तेथे तो आयुक्त,

---

१. विधि अनुकूलन (विशोधन) आदेश, १९५० द्वारे मूळ शब्दाऐवजी दाखल करण्यात आले.
२. विधि अनुकूलन (क्र. १) आदेश, १९५६ द्वारे " आणि " हा शब्द गाळण्यात आला.
३. विधि अनुकूलन (क्र. १) आदेश, १९५६ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

(ग) पंजाबमध्ये, वित्तीय आयुक्त, आणि

(घ) इतरत्र, संविधानाच्या सातव्या अनुसूचीमधील पहिल्या सूचीमध्ये नमूद केलेल्या बाबींच्या संबंधात, केंद्र सरकार आणि इतर बाबींच्या संबंधात, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** सूचनेद्वारे नियुक्त करील असे प्राधिकरण,

असा अर्थ असेल ;

(११) " जिल्हाधिकारी " याला इलाखा शहरात, प्रकरणपरत्वे, कलकत्त्याचा, मद्रासचा किंवा मुंबईचा जिल्हाधिकारी आणि अन्यत्र, जिल्ह्याच्या महसूल-प्रशासनाचा मुख्य प्रभारी अधिकारी, असा अर्थ असेल ;

(१२) " वसाहत " याला---

(क) " गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट, १९३५ भाग तीनच्या प्रारंभानंतर पारित झालेल्या कोणत्याही केंद्रीय अधिनियमात, ब्रिटिश बेटे वगळून हिज मॅजेस्टीच्या डोमिनिअन्सचा कोणताही भाग, भारत व पाकिस्तान ही डोमिनिअन्स (आणि त्या डोमिनिअन्सच्या स्थापनेपूर्वी, ब्रिटिश इंडिया) " स्टॅच्यूट ऑफ वेस्टमिन्स्टर, १९३१ " मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे कोणतेही डोमिनिअन, उक्त डोमिनिअन्सपैकी कोणत्याही डोमिनिअनचा भाग असलेला कोणताही प्रांत किंवा राज्य आणि ब्रिटिश बर्मा, असा अर्थ असेल ; आणि

(ख) उक्त अधिनियमाच्या भाग तीनच्या प्रारंभापूर्वी पारित झालेल्या कोणत्याही केंद्रीय अधिनियमात ब्रिटिश बेटे व ब्रिटिश इंडिया वगळून, हिज मॅजेस्टीच्या डोमिनिअन्सचा कोणताही भाग, असा अर्थ असेल ;

आणि दोन्ही बाबतीत जेथे त्या डोमिनिअन्सचे काही भाग केंद्रीय आणि स्थानिक अशा दोन्ही विधानमंडळांना अधीन असतील तेथे, केंद्रीय विधानमंडळाला अधीन असलेले सर्व भाग म्हणजे एक वसाहत होय, असे या व्याख्येच्या प्रयोजनापुरते मानले जाईल ;

(१३) " प्रारंभ " हा शब्द, अधिनियमाला किंवा विनियमाला अनुलक्षून वापरला असताना त्याचा अर्थ, ज्या दिवशी तो अधिनियम किंवा विनियम अंमलात येतो तो दिवस, असा असेल ;

(१४) " आयुक्त " याचा अर्थ, एखाद्या विभागाच्या महसूल प्रशासनाचा मुख्य प्रभारी अधिकारी, असा असेल ;

(१५) " संविधान " याचा अर्थ, भारताचे संविधान, असा असेल ;

(१६) " कौन्स्युलर अधिकारी " यामध्ये, महा कौंसल, उप कौंसल, कौन्स्युलर प्रतिनिधी, प्रो-कौंसल यांचा आणि महा कौंसल, कौंसल, उप कौंसल, कौन्स्युलर प्रतिनिधी यांची कामे पार पाडण्यासाठी त्या त्या काळी प्राधिकृत झालेल्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश असेल ;

(१७) " जिल्हा न्यायाधीश " याचा अर्थ, मूळ अधिकारितेच्या प्रमुख दिवाणी न्यायालयाचा न्यायाधीश, असा असेल, पण स्वतःच्या सर्वसाधारण किंवा असाधारण दिवाणी अधिकारितेचा वापर करणाऱ्या उच्च न्यायालयाचा त्यात समावेश असणार नाही ;

(१८) " दस्तऐवज " यात, कोणताही मजकूर अभिलिखित करण्यासाठी अक्षरे, आकडे/आकृत्या किंवा चिन्हे अशी जी साधने वापरण्याचे उद्देशित असेल किंवा वापरता येतील त्या साधनांनी किंवा त्यांपैकी एकाहून अधिक साधनांनी कोणत्याही पदार्थावर लिहिलेला, व्यक्त केलेला किंवा रेखलेला तो मजकूर, असा असेल ;

(१९) " अधिनियमिती " यामध्ये, (यात यापुढे व्याख्या केल्याप्रमाणे) एखादा विनियम आणि बंगाल, मद्रास किंवा मुंबई संहितेतील कोणताही विनियम यांचा समावेश असेल, आणि कोणत्याही अधिनियमात किंवा पूर्वोक्त अशा कोणत्याही विनियमात अंतर्भूत असलेल्या अशा कोणत्याही उपबंधाचाही समावेश असेल ;

(२०) ज्या कोणाच्याही व्यक्तिविषयक विधीनुसार दत्तक घेण्यास परवानगी असेल त्याच्या बाबतीत " पिता " किंवा " बाप " यामध्ये, दत्तक पित्याचा किंवा बापाचा समावेश असेल ;

(२१) " वित्तीय वर्ष " याचा अर्थ, एप्रिलच्या पहिल्या दिवशी सुरू होणारे वर्ष, असा असेल ;

(२२) जेव्हा एखादी गोष्ट वस्तुतः प्रामाणिकपणे केलेली असेल,—मग ती हयगयीने केलेली असो वा नसो—

" तेव्हा ती सद्‌भावपूर्वक " केली असल्याचे मानले जाईल ;

(२३) " शासन किंवा सरकार " यामध्ये, केंद्र सरकार आणि कोणतेही राज्य शासन या दोहोंचा समावेश असेल ;

(२४) " सरकारी रोखे " याचा अर्थ, केंद्र सरकारचे रोखे किंवा कोणत्याही राज्य शासनाचे रोखे, असा असेल, पण संविधानाच्या प्रारंभापूर्वी केलेल्या कोणत्याही अधिनियमात किंवा विनियमात हा शब्द आला असता, त्यात कोणत्याही भाग ख राज्याच्या शासनाच्या रोख्यांचा समावेश असणार नाही ;

(२५) " उच्च न्यायालय " हा शब्द दिवाणी कार्यवाहीला अनुलक्षून वापरला असताना, हा शब्दप्रयोग अंतर्भूत असलेला अधिनियम किंवा विनियम भारताच्या ज्या भागात प्रवर्तित असेल तेथील सर्वात वरचे अपिलाचे दिवाणी न्यायालय, (त्यात सर्वोच्च न्यायालयाचा समावेश नाही) असा त्याचा अर्थ असेल ;

(२६) " स्थावर मालमत्ता " यामध्ये जमीन, जमिनीपासून होणारा लाभ, आणि भूबद्ध वस्तू किंवा भूबद्ध अशा कोणत्याही वस्तूशी कायमच्या जखडलेल्या वस्तू, यांचा समावेश आहे ;

(२७) " कारावास " याचा अर्थ, भारतीय दंड संहितेत व्याख्या केली आहे अशा कोणत्याही प्रकारचा कारावास, असा असेल ;

(२८) " भारत " याचा अर्थ,—

(क) डोमिनिअन ऑफ इंडियाच्या स्थापनेआधीच्या कोणत्याही कालावधीबाबत, तेव्हा हिज मॅजेस्टीच्या वर्चस्वाखाली असलेल्या भारतीय संस्थानाधिपतींच्या सर्व राज्यक्षेत्रांसहित ब्रिटिश इंडिया, अशा भारतीय संस्थानाधिपतींच्या वर्चस्वाखाली सर्व राज्यक्षेत्रे आणि वन्यजमाती क्षेत्रे ;

(ख) डोमिनिअन ऑफ इंडियाच्या स्थापनेनंतरच्या आणि संविधानाच्या प्रारंभापूर्वीच्या कोणत्याही कालावधीबाबत, त्या डोमिनिअनमध्ये त्या त्या काळी, समाविष्ट असलेली सर्व राज्यक्षेत्रे ; आणि

(ग) संविधानाच्या प्रारंभानंतरच्या कोणत्याही कालावधीबाबत, भारताच्या राज्यक्षेत्रामध्ये त्या त्या काळी समाविष्ट असलेली सर्व क्षेत्रे,

असा असेल ;

(२९) " भारतीय विधि " याचा अर्थ, संविधानाच्या प्रारंभापूर्वी भारताच्या कोणत्याही प्रांतात किंवा त्याच्या भागात ज्यास विधिचे बळ होते, किंवा त्यानंतर भाग-क राज्यात किंवा भाग-ग राज्यात किंवा त्याच्या भागामध्ये ज्यास विधिचे बळ असेल असा कोणताही अधिनियम, अध्यादेश, विनियम, नियम, [1][आदेश, उपविधि किंवा अन्य संलेख], असा असेल, पण त्यात, युनायटेड किंगड्मच्या संसदेच्या कोणत्याही अधिनियमाचा, अथवा अशा अधिनियमाखाली केल्या गेलेल्या कोणत्याही, ऑर्डर-इन-कौन्सिलचा, नियमाचा किंवा अन्य संलेखाचा समावेश नाही ;

(३०) " भारतीय संस्थान " याचा अर्थ, केंद्र सरकारने संविधानाच्या प्रारंभापूर्वी ज्या कोणत्याही राज्यक्षेत्राला असे संस्थान म्हणून मान्यता दिली ते राज्यक्षेत्र असा असेल — मग त्याचे वर्णन " संस्थान " म्हणून वा " इस्टेट " म्हणून वा " जहागीर " म्हणून केलेले असो वा अन्य प्रकारे केलेले असो ;

(३१) " स्थानिक प्राधिकरण " याचा अर्थ, नगरपालिका समिती, जिल्हा मंडळ, बंदर आयुक्तांचा निकाय अथवा नगरपालिका निधीचे किंवा स्थानिक निधीचे नियंत्रण किंवा व्यवस्थापन करण्यास विधितः हक्कदार असलेले किंवा शासनाने ते काम ज्याच्याकडे सोपवले आहे असे अन्य प्राधिकरण, असा असेल ;

(३२) " दंडाधिकारी " यात, त्या त्या काळी अंमलात असलेल्या फौजदारी प्रक्रिया संहितेखाली दंडाधिकाऱ्याचे सर्व किंवा त्यांपैकी कोणतेही अधिकार वापरणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा समावेश असेल ;

(३३) " नौकाधिपती " हा शब्द जहाजाला अनुलक्षून वापरला असताना त्याचा अर्थ, त्या त्या वेळी जहाजाचे नियंत्रण किंवा कार्यभार जिच्याकडे असेल अशी (पायलट किंवा बंदर मास्तर खेरीजकरून) कोणतीही व्यक्ती, असा असेल ;

(३४) " विलीन राज्यक्षेत्रे " याचा अर्थ, " गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट, १९३५ " च्या कलम २९० क च्या सामर्थ्याने जी राज्यक्षेत्रे, संविधानाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी, जणू काही ती गव्हर्नर-प्रांताचा भाग असावीत किंवा जणू काही ती चीफ-कमिशनर-प्रांत असावीत त्याप्रमाणे प्रशासिली जात होती ती राज्यक्षेत्रे, असा असेल ;

(३५) " महिना " याचा अर्थ, ब्रिटिश कॅलेंडरप्रमाणे गणना केली जाणारा महिना, असा असेल ;

(३६) " जंगम मालमत्ता " याचा अर्थ, स्थावर मालमत्ता खेरीजकरून प्रत्येक प्रकारची मालमत्ता, असा असेल ;

(३७) " शपथ " यात, शपथ घेण्याऐवजी दृढकथन किंवा अधिकथन करण्यास विधितः अनुज्ञात असलेल्या व्यक्तींच्या बाबतीत, दृढकथन व अधिकथन यांचा समावेश असेल ;

(३८) " अपराध " याचा अर्थ, त्या त्या काळी कोणत्याही विधिने शिक्षापात्र केलेली कोणतीही कृती किंवा अकृती, असा असेल ;

---

१. विधि अनुकूलन (विशोधन) आदेश, १९६० द्वारे " आदेश किंवा उपविधी " याऐवजी घातले.

(३९) "**शासकीय राजपत्र**" किंवा "**राजपत्र**" याचा अर्थ, **भारताचे राजपत्र,** किंवा एखाद्या राज्याचे **शासकीय राजपत्र,** असा असेल ;

(४०) "भाग" याचा अर्थ, ज्यामध्ये तो शब्द येतो त्या अधिनियमाचा किंवा विनियमाचा भाग, असा असेल ;

(४१) "भाग क राज्य" याचा अर्थ, [१][संविधान (सातवे विशोधन) अधिनियम, १९५६ पूर्वी संविधानाची पहिली अनुसूची जशी अंमलात होती तशी, त्या] पहिल्या अनुसूचीच्या भाग क मध्ये त्या काळी विनिर्दिष्ट केलेले राज्य, असा असेल आणि भाग ख राज्य याचा अर्थ, त्या अनुसूचीच्या भाग ख मध्ये त्या काळी विनिर्दिष्ट केलेले राज्य, असा असेल आणि भाग ग राज्य याचा अर्थ, त्या अनुसूचीच्या भाग ग मध्ये त्या काळी विनिर्दिष्ट केलेले राज्य किंवा संविधानाच्या २४३ व्या अनुच्छेदाच्या उपबंधाखाली राष्ट्रपतीकडून त्या काळी प्रशासिले जाणारे राज्यक्षेत्र, असा असेल ;

(४२) "व्यक्ती" यात, कोणतीही कंपनी अधिसंघ किंवा इसमांचा समूह — मग तो निगमित असो वा नसो — यांचा समावेश असेल ;

(४३) "राजकीय प्रतिनिधी" याचा अर्थ,—

(क) भारताबाहेरील कोणत्याही क्षेत्राच्या संबंधात, अशा क्षेत्रात केंद्र सरकारचे प्रतिनिधित्व करणारा प्रमुख अधिकारी — मग तो कोणत्याही नावाने संबोधला जात असो— आणि ;

(ख) तो शब्दप्रयोग अंतर्भूत असलेला अधिनियम किंवा विनियम भारतातील ज्या कोणत्याही राज्यक्षेत्रावर विस्तारित नाही त्याच्या संबंधात त्या अधिनियमाखाली किंवा विनियमाखाली राजकीय प्रतिनिधीला असलेले सर्व किंवा त्यांपैकी कोणतेही अधिकार वापरण्यासाठी केंद्र सरकारने नियुक्त केलेला कोणताही अधिकारी,

असा असेल ;

(४४) "इलाखा शहर" याचा अर्थ, प्रकरणपरत्वे, कलकत्ता, मद्रास किंवा मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या साधारण मूळ दिवाणी अधिकारितेच्या त्या त्या काळच्या स्थानिक सीमा, असा असेल ;

(४५) "प्रांत" याचा अर्थ, इलाखा, गव्हर्नर-प्रांत, लेफ्टनंट गव्हर्नर-प्रांत किंवा चिफ कमिशनर-प्रांत, असा असेल ;

(४६) "प्रांतिक अधिनियम" याचा अर्थ, एखाद्या प्रांताच्या गव्हर्नर-इन-कौन्सिलने, लेफ्टनंट-गव्हर्नर-इन-कौन्सिलने किंवा चीफ कमिशनर-इन-कौन्सिलने "इंडियन कौन्सिल्स ॲक्ट्स" पैकी कोणत्याही अधिनियमाखाली किंवा "गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट, १९१५" खाली केलेला अधिनियम, अथवा स्थानिक विधानमंडळाने किंवा एखाद्या प्रांताच्या गव्हर्नरने "गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट" खाली केलेला अधिनियम, अथवा प्रांतिक विधानमंडळाने किंवा एखाद्या प्रांताच्या गव्हर्नरने किंवा कूर्ग विधानपरिषदेने "गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट, १९३५" खाली केलेला अधिनियम, असा असेल ;

(४७) "प्रांतिक सरकार" याचा अर्थ, संविधानाच्या प्रारंभापूर्वी केलेल्या कोणत्याही गोष्टीबाबत, प्रस्तुत प्रांताचे कार्यकारी शासन चालविण्यासाठी संबंधित दिनांकास प्राधिकृत असलेले प्राधिकरण किंवा व्यक्ती, असा असेल ;

(४८) "सार्वजनिक उपद्रव" याचा अर्थ, "भारतीय दंड संहिता" (१८६० चा ४५) यात जशी व्याख्या केली आहे तसा सार्वजनिक उपद्रव, असा असेल ;

(४९) "नोंदलेला" किंवा "नोंदणी केलेला" हे शब्द दस्तऐवजाला अनुलक्षून वापरले असताना, त्यांचा अर्थ, दस्तऐवजांच्या नोंदणीसाठी त्या त्या काळी अंमलात असलेल्या विधिखाली [३][भारतात] नोंदलेला किंवा नोंदणी केलेला, असा असेल ;

(५०) "विनियम" याचा अर्थ, राष्ट्रपतीने [३][संविधानाच्या २४० व्या अनुच्छेदाखाली] केलेला विनियम असा असेल, आणि त्यात [३][राष्ट्रपतीने संविधानाच्या २४३ व्या अनुच्छेदाखाली केलेला विनियम व] केंद्र सरकारने "गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट, १८७०" किंवा "गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट, १९१५" किंवा "गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट, किंवा गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट, १९३५" याखाली केलेला कोणताही विनियम, यांचा समावेश असेल ;

---

१. "विधि अनुकूलन (क्र. १) आदेश, १९५६" द्वारे समाविष्ट करण्यात आले.

२. विधि अनुकूलन (क्र. १) आदेश, १९५६ द्वारे "भाग क राज्यात किंवा भाग ग राज्यात" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. वरील आदेशाद्वारे समाविष्ट करण्यात आले.

(५१) "नियम" याचा अर्थ, कोणत्याही अधिनियमितीने प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून केलेला नियम, असा आहे, आणि त्यात कोणत्याही अधिनियमितीखाली नियम म्हणून केलेल्या विनियमाचा समावेश असेल ;

(५२) "अनुसूची" याचा अर्थ, ज्यामध्ये तो शब्द येतो त्या अधिनियमाची किंवा विनियमाची अनुसूची, असा असेल ;

(५३) "अनुसूचित जिल्हा" याचा अर्थ, अनुसूचित जिल्हे अधिनियम, १८७४ मध्ये जशी व्याख्या केली आहे तसा अनुसूचित जिल्हा, असा असेल ;

(५४) "कलम" याचा अर्थ, ज्यामध्ये तो शब्द येतो त्या अधिनियमाचे किंवा विनियमाचे कलम, असा असेल ;

(५५) "जहाज" यात, फक्त वल्ह्यांच्याच योगे जे चालवले जात नाही असे जे जलयान जलसंचारासाठी वापरले जाते अशा प्रत्येक प्रकाराच्या जलयानाचा समावेश असेल ;

(५६) जी व्यक्ती आपले नाव लिहिण्यास असमर्थ आहे तिला अनुलक्षून, "स्वाक्षरी करणे" हा शब्द वापरला असताना या शब्दाचे व्याकरणिक रूपभेद व सजातीय शब्दप्रयोग यांसह त्यात, "निशाणी करणे" या शब्दाचा त्याचे व्याकरणिक रूपभेद व सजातीय शब्दप्रयोग यांसह समावेश असेल ;

(५७) "पुत्र" यात, ज्या कोणाच्याही व्यक्तिविषयक विधिनुसार दत्तकाला परवानगी असेल त्याच्या बाबतीत, दत्तक पुत्राचा समावेश असेल ;

[१][(५८) "राज्य" याचा अर्थ,—

(क) "संविधान (सातवे विशोधन) अधिनियम, १९५६" च्या पूर्वीच्या कोणत्याही कालावधीबाबत, भाग क राज्य, भाग ख राज्य किंवा भाग ग राज्य, असा असेल, आणि

(ख) अशा प्रारंभानंतरच्या कोणत्याही कालावधीबाबत, संविधानाच्या पहिल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेले राज्य, असा असेल आणि त्यात संघराज्य क्षेत्राचा समावेश असेल ;]

(५९) "राज्य अधिनियम" याचा अर्थ, संविधानाने स्थापन केलेल्या किंवा चालू ठेवलेल्या राज्य विधानमंडळाने पारित केलेला अधिनियम, असा आहे ;

(६०) "राज्य शासन" याचा अर्थ,—

(क) संविधानाच्या प्रारंभापूर्वी केलेल्या कोणत्याही गोष्टींबाबत भाग क राज्यामध्ये समनुरूप प्रांताचे प्रांतिक सरकार, भाग ख राज्यामध्ये समनुरूप सामील संस्थानातील कार्यकारी शासन चालविण्यासाठी संबंधित दिनांकास प्राधिकृत असलेले प्राधिकरण किंवा व्यक्ती आणि भाग ग राज्यामध्ये केंद्र सरकार असा असेल ; [२][ * * * ]

(ख) [३][संविधानाच्या प्रारंभानंतर व "संविधान (सातवे विशोधन) अधिनियम, १९५६" च्या प्रारंभापूर्वी केलेल्या] कोणत्याही गोष्टींबाबत, भाग क राज्यामध्ये राज्यपाल, भाग ख राज्यामध्ये राजप्रमुख व भाग ग राज्यामध्ये केंद्र सरकार, असा असेल ;

[४][(ग) "संविधान (सातवे विशोधन) अधिनियम, १९५६, च्या प्रारंभानंतर केलेल्या किंवा करावयाच्या कोणत्याही गोष्टींबाबत, राज्यामध्ये राज्यपाल व संघ राज्यक्षेत्रामध्ये केंद्र सरकार, असा असेल ;

आणि संविधानाच्या अनुच्छेद २५८ क खाली भारत सरकारकडे सोपवलेल्या कार्याच्या संबंधात त्या शब्दामध्ये, त्या अनुच्छेदाखाली स्वतःला देण्यात आलेल्या प्राधिकाराच्या व्याप्तीत कार्य करणाऱ्या केंद्र सरकारचा समावेश असेल ;]

(६१) "पोटकलम" याचा अर्थ, ज्यामध्ये तो शब्द येतो त्या कलमाचे पोटकलम, असा असेल ;

(६२) शपथ घेण्यासाठी दृढकथन किंवा अधिकथन करण्यास विधितः अनुज्ञात असलेल्या व्यक्तीच्या बाबतीत, "शपथ घेणे" या शब्दाचे व्याकरणिक रूपभेद व सजातीय शब्दप्रयोग यांसह त्या शब्दात, दृढकथन करणे व अधिकथन करणे, याचा समावेश असेल ;

[५][(६२क) "संघ राज्यक्षेत्र" याचा अर्थ, संविधानाच्या पहिल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेले कोणतेही राज्यक्षेत्र, असा असेल आणि त्यात, भारताच्या राज्यक्षेत्रामध्ये समाविष्ट असलेल्या पण त्या अनुसूचीत विनिर्दिष्ट न केलेल्या अन्य कोणत्याही क्षेत्राचा समावेश असेल ;]

---

१. विधि अनुकूलन (क्र. १) आदेश, १९५६ द्वारे मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

२. वरील आदेशाद्वारे "आणि" हा शब्द गाळण्यात आला.

३. वरील आदेशानुसार "संविधानाच्या प्रारंभानंतर केलेल्या किंवा करावयाच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. वरील आदेशानुसार हा उप खंड समाविष्ट करण्यात आला.

५. वरील आदेशानुसार हा खंड समाविष्ट करण्यात आला.

(६३) " जलयान " यामध्ये, कोणतेही जहाज किंवा नौका किंवा जलसंचारासाठी वापरले जाणारे अन्य कोणत्याही प्रकारचे जलयान, यांचा समावेश असेल ;

(६४) " मृत्युपत्र " यामध्ये, क्रोडपत्र व मालमत्तेची स्वेच्छापूर्वक मरणोत्तर व्यवस्था करणारा प्रत्येक लेख, यांचा समावेश असेल ;

(६५) " लेखन " याचा निर्देश करणाऱ्या शब्दप्रयोगाचा अर्थ, त्यात मुद्रण, शिलामुद्रण, छायाचित्र या किंवा शब्दांनी दृश्य रूपात आविष्कृत करणाऱ्या किंवा पुनर्निर्मित करण्याच्या अन्य पद्धतीचे निर्देश समाविष्ट आहेत, असा लावला जाईल, आणि

(६६) " वर्ष " याचा अर्थ, ब्रिटिश कॅलेंडरनुसार गणना केले जाणारे वर्ष, असा असेल ;

**मागील व्याख्या, पूर्वीच्या अधिनियमितींना लागू असणे.**

४. (१) पुढील शब्द व शब्दप्रयोग म्हणजे,—

कलम ३ मधील " शपथपत्र ", " बॅरिस्टर ", [१]* * * * " जिल्हा न्यायाधीश ", " बाप " किंवा " पिता ", [१]* * * [२]* * * * [१]* * " स्थावर मालमत्ता ", " कारावास ", [१]* * * " दंडाधिकारी ", " महिना ", " जंगम मालमत्ता ", " शपथ ", " व्यक्ती ", " कलम ", " मुलगा " किंवा " पुत्र ", " शपथ घेणे ", " मृत्यूपत्र " व " वर्ष " यांच्या व्याख्या, विषयात किंवा संदर्भात, काहीही प्रतिकूल नसेल तर, ३ जानेवारी, १८६८ या दिवसानंतर केलेले सर्व [३][केंद्रीय अधिनियम] आणि १४ जानेवारी, १८८७ रोजी किंवा त्यानंतर केलेले सर्व विनियम यांनाही लागू आहेत.

(२) पुढील शब्द व शब्दप्रयोग म्हणजे उक्त कलमातील " अपप्रेरणा देणे ", " प्रकरण ", " प्रारंभ ", " वित्तीय वर्ष ", " स्थानिक प्राधिकरण ", " नौकाधिपति ", " अपराध ", " भाग ", " सार्वजनिक उपद्रव ", " नोंदलेला ", किंवा " नोंदणी केलेला ", " अनुसूची ", " जहाज ", " स्वाक्षरी करणे ", " पोटकलम " व " लेखन " यांच्या व्याख्या, विषयात किंवा संदर्भात काहीही प्रतिकूल नसेल तर, १४ जानेवारी, १८८७ रोजी किंवा त्यानंतर केलेले सर्व [३][केंद्रीय अधिनियम] आणि विनियम यांनाही लागू आहेत.

**विवक्षित व्याख्या भारतीय विधिंना लागू असणे.**

[४][**४क.** (१) कलम ३ मधील " ब्रिटिश इंडिया ", " केंद्रीय अधिनियम ", " मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकरण ", " मुख्य महसूल प्राधिकरण ", " संविधान ", " **राजपत्र** ", " शासन ", " सरकारी रोखे ", " उच्च न्यायालय ", " भारत ", " भारतीय विधि ", " भारतीय संस्थान ", " विलीन राज्यक्षेत्रे ", " **शासकीय राजपत्र** ", " भाग क राज्य ", " भाग ख राज्य ", " भाग ग राज्य ", " प्रांतिक सरकार ", " राज्य व राज्य शासन " या शब्दप्रयोगांच्या व्याख्या, विषयात किंवा संदर्भात काहीही प्रतिकूल नसेल तर सर्व भारतीय विधिंना लागू असतील.

(२) कोणत्याही भारतीय विधित, केंद्र सरकारच्या किंवा कोणत्याही राज्य शासनाच्या महसुलाबाबतचे निर्देश कोणत्याही शब्दात केलेले असोत—त्याचा अर्थ, १ एप्रिल, १९५० रोजी व तेव्हापासून " भारताचा एकत्रित निधी किंवा, प्रकरणपरत्वे, " त्या राज्यांचा एकत्रित निधी यांचे निर्देश म्हणून लावला जाईल.]

## अर्थ लावण्याचे सर्वसाधारण नियम

**अधिनियमिती प्रवर्तित होणे.**

५. [५][(१) जेथे एखादा अधिनियम एखाद्या विशिष्ट दिवशी प्रवर्तित होणार असल्याचे व्यक्त करण्यात आले नसेल, तेथे, ज्या दिवशी त्याला,—

(क) संविधानाच्या प्रारंभापूर्वी केलेल्या केंद्रीय अधिनियमाच्या बाबतीत, गव्हर्नर जनरलची, आणि

(ख) एखादा संसद अधिनियमाच्या बाबतीत, राष्ट्रपतींची,

अनुमती मिळेल त्या दिवशी तो प्रवर्तित होईल.]

[६]* * * * * * *

(३) एतद्विरुद्ध व्यक्त झालेले नसेल तर, एखादा [३][केंद्रीय अधिनियम] किंवा विनियम हा त्याच्या प्रारंभाच्या आधीचा दिवस संपताच तात्काळ प्रवर्तित होणारा आहे, असा त्याचा अर्थ लावला जाईल.

---

१. विधि अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे " ब्रिटिश इंडिया ", " भारत सरकार ", " उच्च न्यायालय ", व " स्थानिक शासन " हे शब्द निरसित करण्यात आले.

२. १९१९ चा अधिनियम, १८, कलम ३ व अनुसूचीद्वारे " हिज मॅजेस्टी किंवा क्वीन " हे शब्द निरसित करण्यात आले.

३. विधि अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे " गव्हर्नर जनरल-इन-कौंसिलचे अधिनियम, " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

४. विधि अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे दाखल केलेल्या मूळ कलमाऐवजी हे कलम, अनुकूलन आदेश, १९५० द्वारे दाखल करण्यात आले.

५. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे पूर्वीच्या पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

६. वरील आदेशाद्वारे पोट-कलम (२) निरसित करण्यात आले.

**५क.** [गव्हर्नर जनरलचा अधिनियम प्रवर्तित होण्याबाबत.] अनुकूलन आदेश, १९४७ द्वारे निरसित.

**निरसनांचा परिणाम.**

**६.** जेथे आतापर्यंत केलेली किंवा यापुढे करावयाची अधिनियमिती या अधिनियमाद्वारे अथवा या अधिनियमाच्या प्रारंभानंतर केल्या जाणाऱ्या कोणत्याही [१][केंद्रीय अधिनियमाद्वारे] किंवा विनियमाद्वारे निरसित केली जाईल तेथे, विरुद्ध उद्देश दिसून न आल्यास, त्या निरसनामुळे,—

(क) निरसन परिणामक होण्याच्या वेळी अंमलात नसलेले किंवा विद्यमान नसलेले, काहीही पुनरुज्जीवित होणार नाही ; अथवा

(ख) याप्रमाणे निरसित झालेल्या अधिनियमितींच्या पूर्वप्रवर्तनावर किंवा त्याखाली रीतसर केलेल्या किंवा राहिलेल्या कशावरही परिणाम होणार नाही ; अथवा

(ग) याप्रमाणे निरसित झालेल्या कोणत्याही अधिनियमितीखाली संपादन केलेल्या किंवा उपार्जित झालेल्या कोणत्याही हक्कावर, विशेषाधिकारावर अथवा त्याखाली ओढवलेल्या आबंधनांवर किंवा दायित्वावर परिणाम होणार नाही ; अथवा

(घ) याप्रमाणे निरसित झालेल्या कोणत्याही अधिनियमितीविरुद्ध केलेल्या कोणत्याही अपराधाबाबत ओढवलेल्या कोणत्याही शास्तीवर, समपहरणावर, किंवा शिक्षेवर परिणाम होणार नाही ; अथवा

(ङ) पूर्वोक्त असा कोणताही हक्क, विशेषाधिकार, आबंधन, दायित्व, शास्ती, समपहरण किंवा शिक्षा याबाबतच्या कोणत्याही अन्वेषणावर, वैध कार्यवाहीवर किंवा उपायावर परिणाम होणार नाही,

आणि तो निरसन अधिनियम किंवा विनियम जणू काही पारित झालेला नसावा, त्याप्रमाणे, असे कोणतेही अन्वेषण, वैध कार्यवाही सुरू करता येईल, चालू ठेवता येईल किंवा उपाय करता येईल आणि अशी कोणतीही शास्ती, समपहरण किंवा शिक्षा लादता येईल.

**अधिनियमातील किंवा विनियमातील पाठात विशोधन करणाऱ्या अधिनियमाचे निरसन.**

[२][**६क.** जी कोणतीही अधिनियमिती कोणत्याही [१][केंद्रीय अधिनियमाच्या] किंवा विनियमाच्या पाठात व्यक्तपणे कोणताही मजकूर गाळून, अधिक घालून, किंवा त्याऐवजी दुसरा मजकूर घालून याचे विशोधन करते, ती अधिनियमिती, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर करण्यात आलेल्या [१][ केंद्रीय अधिनियमाद्वारे] किंवा विनियमाद्वारे निरसित होईल तेथे, वेगळा उद्देश दिसून न आल्यास, याप्रमाणे निरसित होणाऱ्या अधिनियमितीने केलेले व अशा निरसनाच्या वेळी प्रवर्तित असलेले असे कोणतेही विशोधन चालू राहण्यावर, त्या निरसनामुळे परिणाम होणार नाही.]

**निरसित अधिनियमितींचे पुनरुज्जीवन.**

**७.** (१) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर केल्या जाणाऱ्या कोणत्याही [१][केंद्रीय अधिनियमात] किंवा विनियमात, संपूर्णतः किंवा अंशतः निरसित झालेली कोणतीही अधिनियमिती, संपूर्णतः किंवा अंशतः पुनरुज्जीवित करण्यासाठी, ते प्रयोजन नमूद करणे आवश्यक असेल.

(२) ३ जानेवारी, १८६८ नंतर केलेले सर्व [१][केंद्रीय अधिनियम] आणि १४ जानेवारी, १८८७ रोजी किंवा त्यानंतर केलेले विनियम यांनाही हे कलम लागू आहे.

**निरसित अधिनियमितींच्या निर्देशांचा अर्थ लावणे.**

**८.** [३][(१)] हा अधिनियम किंवा या अधिनियमाच्या प्रारंभानंतर करण्यात आलेला कोणताही [१][केंद्रीय अधिनियम] किंवा विनियम पूर्वीच्या एखाद्या अधिनियमितीचा कोणताही उपबंध निरसित करील आणि आपरिवर्तनासह किंवा त्याविना ती पुन्हा अधिनियमित करील तेथे, अशा प्रकारे निरसित केलेल्या उपबंधाबाबत अन्य कोणत्याही अधिनियमितीमध्ये किंवा कोणत्याही संलेखामध्ये केलेले निर्देश हे, वेगळा उद्देश दिसून येत नसेल तर, अशा प्रकारे पुन्हा अधिनियमित केलेल्या उपबंधाचे निर्देश आहेत, असा त्यांचा अर्थ लावण्यात येईल.

[४][(२) [५][१५ ऑगस्ट, १९४७ युनायटेड किंगड्मच्या संसदेच्या कोणत्याही अधिनियमाने] पूर्वीच्या एखाद्या अधिनियमितीचा कोणताही उपबंध [५][निरसित केला असेल] आणि आपरिवर्तनासह किंवा त्याविना [५][पुन्हा अधिनियमित केला असेल] तेथे, अशा प्रकारे निरसित केलेल्या उपबंधांबाबत कोणत्याही [१][केंद्रीय अधिनियमामध्ये] किंवा कोणत्याही विनियमामध्ये किंवा संलेखामध्ये केलेले निर्देश हे, वेगळा उद्देश दिसून येत नसेल तर, अशा प्रकारे पुन्हा अधिनियमित केलेल्या उपबंधाचे निर्देश आहेत, असा त्यांचा अर्थ लावण्यात येईल.]

---

१. विधि अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "गव्हर्नर जनरल-इन-कौन्सिलच्या अधिनियमांद्वारे" या मजकुराऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

२. १९३६ चा अधिनियम, १९, कलम २ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

३. १९१९ चा अधिनियम १८, कलम २ आणि अनुसूची एक द्वारे मूळ कलम ८ ला पोटकलम (१) असा नवीन क्रमांक दिला.

४. वरील अधिनियमाच्या कलम २ आणि अनुसूची एक द्वारे समाविष्ट केले.

५. विधि अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

**कालावधीचा प्रारंभ व समाप्ती.**

**९.** (१) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर करण्यात येणाऱ्या कोणत्याही [1][केंद्रीय अधिनियमामध्ये] किंवा विनियमामध्ये दिवसांच्या मालिकेतील अथवा अन्य कोणत्याही कालावधीपैकी पहिला दिवस वगळण्यासाठी "पासून" हा शब्द आणि दिवसांच्या मालिकेतील किंवा अन्य कोणत्याही कालावधीपैकी शेवटचा दिवस समाविष्ट करण्यासाठी "पर्यंत" हा शब्द पुरेसा होईल.

(२) ३ जानेवारी, १८६८ नंतर केलेले सर्व [1][केंद्रीय अधिनियम] आणि १४ जानेवारी, १८८७ रोजी किंवा त्यानंतर केलेले सर्व विनियम यांनाही हे कलम लागू आहे.

**कालगणना.**

**१०.** (१) जेथे कोणतीही कृती किंवा कार्यवाही, कोणत्याही न्यायालयात किंवा कार्यालयात विवक्षित दिवशी किंवा विहित कालावधीमध्ये करण्यास, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर करण्यात येणाऱ्या कोणत्याही [1][केंद्रीय अधिनियमाद्वारे] किंवा विनियमाद्वारे निदेश देण्यात येईल किंवा मुभा देण्यात येईल तेथे, ते न्यायालय किंवा कार्यालय त्या दिवशी किंवा विहित कालावधीच्या शेवटच्या दिवशी बंद असेल तर, त्यानंतर ज्या पुढील दिवशी न्यायालय किंवा कार्यालय उघडे असेल त्या दिवशी ती कृती किंवा कार्यवाही केल्यास, ती योग्य वेळी केली गेली, असे समजण्यात येईल :

परंतु, ज्या कृतीस किंवा कार्यवाहीस भारतीय मुदत अधिनियम, १८७७ (१८७७ चा १५) लागू आहे तिला या कलमातील कोणतीही गोष्ट लागू असणार नाही.

(२) १४ जानेवारी, १८८७ रोजी किंवा त्यानंतर केलेले सर्व [1][केंद्रीय अधिनियम] आणि विनियम यांनाही हे कलम लागू आहे.

**अंतराची मोजणी.**

**११.** या अधिनियमाच्या प्रारंभानंतर करण्यात येणाऱ्या कोणत्याही [1][केंद्रीय अधिनियमाच्या] किंवा विनियमांच्या प्रयोजनासाठी कोणत्याही अंतराची मोजणी करताना ते अंतर, वेगळा उद्देश दिसून येत नसेल तर, क्षैतिज समतलावर सरळ रेषेत मोजण्यात येईल.

**अधिनियमितीमध्ये शुल्क यथाप्रमाण असल्याचे समजणे.**

**१२.** सध्या अंमलात असलेल्या किंवा यापुढे अंमलात येणाऱ्या कोणत्याही अधिनियमितीनुसार जेथे, कोणत्याही मालाच्या किंवा व्यापारी मालाच्या वजनाप्रमाणे, मापाप्रमाणे किंवा किंमतीप्रमाणे कोणत्याही विवक्षित परिमाणावर कोणतेही सीमाशुल्क किंवा उत्पादन शुल्क अथवा त्याच स्वरुपाचे कोणतेही शुल्क आकारावयाचे असेल तेथे, कोणत्याही जास्त किंवा कमी परिमाणावर तसेच शुल्क त्याच प्रमाणानुसार आकारणीयोग्य असेल.

**लिंग आणि संख्या.**

**१३.** सर्व [1][केंद्रीय अधिनियमांमध्ये] आणि विनियमांमध्ये, विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसेल तर,—

(१) पुल्लिंगवाचक शब्दांमध्ये स्त्रीलिंगी शब्दांचा समावेश असल्याचे मानले जाईल, आणि

(२) एकवचनी शब्दांमध्ये अनेकांचा समावेश असेल आणि तसेच त्याच्या उलट असल्याचेही मानले जाईल.

**१३क.** [1][सर्व सत्ताधीशांचे निर्देश.] अनुकूलन आदेश, १९५० द्वारे निरसित.

## अधिकार आणि कार्याधिकारी

**प्रदान केलेले अधिकार वेळोवेळी वापरणे.**

**१४.** (१) जेथे, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर करण्यात येणाऱ्या कोणत्याही [1][केंद्रीय अधिनियमाद्वारे] किंवा विनियमाद्वारे [3]* * * * * कोणताही अधिकार प्रदान करण्यात येईल तेथे, [4][वेगळा उद्देश दिसून न आल्यास] प्रसंगानुसार आवश्यक असेल त्याप्रमाणे तो अधिकार वेळोवेळी वापरता येईल.

(२) १४ जानेवारी, १८८७ रोजी किंवा त्यानंतर केलेले सर्व [1][केंद्रीय अधिनियम] आणि विनियम यांनाही हे कलम लागू आहे.

---

१. विधि अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "गव्हर्नर जनरल-इन-कौन्सिलचा अधिनियम" या शब्दाऐवजी "केंद्रीय अधिनियम" हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला.

२. आता भारतीय मुदत अधिनियम, १९०८ (१९०८ चा ९) पहा.

३. १९१९ चा अधिनियम १८, कलम २ व अनुसूचीद्वारे "शासनाला" हा शब्द गाळण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम २ व अनुसूचीद्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

नियुक्ती करण्याच्या अधिकारामध्ये पदाधिकारपरत्वे नियुक्त करण्याच्या अधिकाराचा समावेश असणे.

**१५.** कोणतेही पद भरण्यासाठी किंवा कोणतेही कार्य करण्यासाठी एखाद्या व्यक्तीला नियुक्त करण्याचा अधिकार कोणत्याही [१][केंद्रीय अधिनियमाद्वारे] किंवा विनियमाद्वारे प्रदान करण्यात आला असेल तेथे, व्यक्तपणे अन्यथा उपबंधित केलेले नसल्यास, अशी कोणतीही नियुक्ती या अधिनियमाच्या प्रारंभानंतर करावयाची झाल्यास ती, नामनिर्देश करून किंवा पदाधिकारपरत्वे करता येईल.

नियुक्त करण्याच्या अधिकारामध्ये निलंबित करण्याच्या किंवा पदच्युत करण्याच्या अधिकाराचा समावेश असणे.

**१६.** जेथे कोणतीही नियुक्ती करण्याचा अधिकार कोणत्याही [१][केंद्रीय अधिनियमाद्वारे] किंवा विनियमाद्वारे प्रदान करण्यात आला असेल तेथे, वेगळा उद्देश दिसून न आल्यास, [२][त्या त्या काळी] नियुक्ती करण्याचा अधिकार असलेल्या प्राधिकरणाला अधिकाराचा वापर करून, कोणत्याही व्यक्तीला निलंबित करण्याचा किंवा पदच्युत करण्याचादेखील अधिकार असेल,— [३][मग ती व्यक्ती त्याने स्वत: नियुक्त केलेली असो वा अन्य कोणत्याही प्राधिकरणाने केलेली असो].

कार्याधिकाऱ्यांचे प्रतिनिधान.

**१७.** (१) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर करण्यात येणाऱ्या कोणत्याही [१][केंद्रीय अधिनियमात] किंवा विनियमात, त्या त्या काळी एखाद्या पदाची कार्ये करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला किंवा एखाद्या व्यक्तिगणाला एखादा विधी लागू आहे हे दर्शवण्यासाठी त्या काळी ती कार्ये करत असलेल्या अधिकाऱ्यांचे किंवा सर्वसामान्यपणे जो अधिकारी ती कार्ये करतो त्या अधिकाऱ्याचे पदाभिधान नमूद करणे पुरेसे होईल.

(२) ३ जानेवारी, १८६८ नंतर केलेले सर्व [१][केंद्रीय अधिनियम], आणि १४ जानेवारी, १८८७ रोजी किंवा त्यानंतर केलेले सर्व विनियम यांना देखील हे कलम लागू आहे.

उत्तराधिकारी.

**१८.** (१) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर करण्यात येणाऱ्या कोणत्याही [१][केंद्रीय अधिनियमात] किंवा विनियमांत, कोणतेही कार्याधिकारी किंवा उत्तराधिकारी यांची निरंतर परंपरा असलेले निगम यांचा उत्तराधिकाऱ्याच्या एखाद्या विधिशी संबंध दर्शवण्यासाठी, त्याचा कार्याधिकाऱ्यांशी किंवा निगमाशी असलेला संबंध व्यक्त करणे पुरेसे होईल.

(२) ३ जानेवारी, १८६८ नंतर केलेले सर्व [१][केंद्रीय अधिनियम] आणि १४ जानेवारी, १८८७ रोजी किंवा त्यानंतर केलेले सर्व विनियम यांना देखील हे कलम लागू आहे.

कार्यालयीन मुख्याधिकारी आणि दुय्यम कर्मचारी.

**१९.** (१) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर करण्यात येणाऱ्या कोणत्याही [१][केंद्रीय अधिनियमामध्ये] किंवा विनियमामध्ये, एखाद्या कार्यालयाच्या मुख्य किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संबंधित असलेला विधि, वरिष्ठांच्या जागी त्या पदाची कामे विधित: पार पाडणाऱ्या प्रतिनियुक्तांना किंवा दुय्यम कर्मचाऱ्यांना लागू असेल हे व्यक्त करण्यासाठी वरिष्ठांचे कर्तव्य विहित करणे पुरेसे होईल.

(२) ३ जानेवारी, १८६८ नंतर केलेल्या सर्व [१][केंद्रीय अधिनियमांना] आणि १४ जानेवारी, १८८७ रोजी किंवा त्यानंतर केलेल्या सर्व विनियमांना देखील हे कलम लागू आहे.

## अधिनियमितीखाली केलेले आदेश, नियम, इत्यादींच्या संबंधातील उपबंध

अधिनियमितीखाली पुर:सृत केलेले आदेश, इत्यादींचा अर्थ लावणे.

**२०.** जेथे कोणतीही [४][अधिसूचना], आदेश, योजना, नियम, प्रपत्र, किंवा उपविधि पुर:सृत करण्याचा अधिकार कोणत्याही [१][केंद्रीय अधिनियमाद्वारे] किंवा विनियमांद्वारे प्रदान करण्यात आलेला असेल, तेथे ती [४][अधिसूचना] आदेश, योजना, नियम, प्रपत्र किंवा उपविधी हे या अधिनियमाच्या प्रारंभानंतर पुर:सृत करण्यात आले असल्यास, त्यात वापरलेल्या शब्दप्रयोगांना, विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसेल तर, तो अधिकार प्रदान करणाऱ्या अधिनियमांत किंवा विनियमात जसे अर्थ असतील तसेच ते ते अर्थ असतील.

---

१. विधि अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "गव्हर्नर जनरल-इन-कौन्सिलचा अधिनियम" या शब्दोल्लेखाऐवजी "केंद्रीय अधिनियम" हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला.

२. १९२८ चा अधिनियम २८, कलम २ व अनुसूची याद्वारे समाविष्ट करण्यात आले.

३. वरील अधिनियमाच्या कलम २ व अनुसूची याद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. १९०३ चा अधिनियम १, कलम ३ व अनुसूची दोन याद्वारे समाविष्ट करण्यात आले.

**अधिसूचना, आदेश नियम किंवा उपविधि पुर:सृत करण्याच्या अधिकारामध्ये, त्यात भर घालण्याच्या, विशोधन करण्याच्या, बदल करण्याच्या किंवा ते विखंडित करण्याच्या अधिकारांचा समावेश असणे.**

**२१.** जेथे [1][अधिसूचना], आदेश, नियम, किंवा उपविधि [2][पुर:सृत करण्याचा] अधिकार कोणत्याही [3][केंद्रीय अधिनियमाद्वारे] किंवा विनियमांद्वारे प्रदान करण्यात आला असेल तेथे, त्या अधिकारामध्ये, याप्रमाणे पुर:सृत केलेल्या कोणतीही [1][अधिसूचना], आदेश नियम किंवा उपविधि यात भर घालण्याच्या, विशोधन करण्याच्या, बदल करण्याच्या किंवा ते विखंडित करण्याच्या अधिकाराचा समावेश होत असून तो तशाच रीतीने आणि तशाच मंजुरीच्या व (काही शर्ती असल्यास) तशाच शर्तीच्या अधीनतेने वापरण्याजोगा असेल.

**अधिनियमिती पारित होणे व तिचा प्रारंभ होणे यांच्या दरम्यान नियम किंवा उपविधि करणे व आदेश पुर:सृत करणे.**

**२२.** जो कोणताही [3][केंद्रीय अधिनियम] किंवा विनियम, तो पारित होताच तात्काळ अंमलात यावयाचा नसेल त्याद्वारे जर, तो अधिनियम, किंवा विनियम लागू करण्याबाबत अथवा कोणत्याही न्यायालयाची किंवा कार्यालयाची स्थापना किंवा त्याखाली कोणत्याही न्यायाधीशाची किंवा अधिकाऱ्याची नियुक्ती याबाबत अथवा त्या अधिनियमाखाली किंवा विनियमाखाली एखादी गोष्ट कोणत्या व्यक्तीने किंवा कोणत्या वेळी किंवा कोणत्या स्थळी किंवा कोणत्या रीतीने किंवा किती फी भरून करावयाची त्याबाबत नियम किंवा उपविधि करण्याचा अथवा आदेश पुर:सृत करण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला तर, तो अधिनियम किंवा विनियम पारित झाल्यानंतर कोणत्याही वेळी तो अधिकार वापरता येईल, पण याप्रमाणे केलेले नियम, उपविधि किंवा पुर:सृत केलेले आदेश त्या अधिनियमाचा किंवा विनियमाचा प्रारंभ होईपर्यंत परिणामक होणार नाहीत.

**नियम किंवा उपविधि आधी प्रकाशित करून मग पुर:सृत करण्याबाबत लागू असलेले उपबंध.**

**२३.** जेथे कोणत्याही [3][केंद्रीय अधिनियमानुसार] किंवा विनियमानुसार नियम, किंवा उपविधी करण्याचा अधिकार, ते नियम किंवा उपविधि आधी प्रकाशित करून पुर:सृत करावयाचे या शर्तीच्या अधीनतेने देण्यात आला असल्याचे व्यक्त झालेले असेल तेथे, पुढील उपबंध लागू होतील, ते असे :—

(१) ते नियम किंवा उपविधि करण्याचा अधिकार असलेले प्राधिकरण ते करण्यापूर्वी, त्याद्वारे ज्यांच्यावर परिणाम होण्याचा संभव असेल त्या व्यक्तींच्या माहितीसाठी नियोजित नियमांचे किंवा उपविधिंचे प्रारूप प्रकाशित करील ;

(२) प्रकाशन त्या प्राधिकरणास योग्य वाटेल अशा पद्धतीने करण्यात येईल, अथवा आधी प्रकाशित करण्यासंबंधीच्या शर्तीनुसार तसे आवश्यक असल्यास [4][संबंधित शासन] विहित करील त्या पद्धतीने करण्यात येईल ;

(३) ते प्रारूप कोणत्या दिनांकास किंवा कोणत्या दिनांकानंतर विचारात घेतले जाईल ते विनिर्दिष्ट करणारी नोटीस त्या प्रारूपासोबत प्रकाशित करण्यात येईल ;

(४) नियम किंवा उपविधि करण्याचा अधिकार असलेल्या प्राधिकरणाकडे याप्रमाणे विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या दिनांकापूर्वी प्रारूपाबाबत कोणत्याही व्यक्तीकडून कोणतीही हरकत किंवा सूचना आल्यास, नियम किंवा उपविधि करण्याचा अधिकार असलेले प्राधिकरण आणि जेथे ते नियम किंवा उपविधि अन्य प्राधिकरणाच्या मंजुरीने, मान्यतेने किंवा सहमतीने करावयाचे असतील तेथे तेही प्राधिकरण, त्या हरकतीचा किंवा सूचनेचा विचार करील ;

(५) नियम किंवा उपविधि आधी प्रकाशित करून मग पुर:सृत करण्याचा अधिकाराचा वापर करून जो नियम किंवा उपविधि करण्यात आल्याचे दिसते त्याचे [5]**[शासकीय राजपत्रातील]** प्रकाशन, हे तो नियम किंवा उपविधि रीतसर करण्यात आल्याचा निर्णायक पुरावा असेल.

---

१. १९०३ चा अधिनियम १, कलम ३ व अनुसूची दोन याद्वारे समाविष्ट करण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ३ व अनुसूची दोन याद्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आले.

३. विधि अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "गव्हर्नर जनरल-इन कौंसिलचा अधिनियम" या शब्दोल्लेखांऐवजी "केंद्रीय अधिनियम" हा शब्दोल्लेख, दाखल करण्यात आला.

४. विधि अनुकूलन आदेश, १९५० "केंद्र सरकार किंवा प्रांतिक सरकार" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. विधि अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "राजपत्रातील" या शब्दाऐवजी दाखल करण्यात आले.

निरसित करून पुन्हा अधिनियमित केलेल्या अधिनियमितीखाली पुर:सृत केलेले आदेश, इत्यादी चालू राहणे.

२४. जेथे कोणताही [1][केंद्रीय अधिनियम] किंवा विनियम या अधिनियमाच्या प्रारंभानंतर निरसित करण्यात येऊनच, आपरिवर्तनासह किंवा त्याशिवाय पुन्हा अधिनियमित करण्यात येईल तेथे, अन्यथा व्यक्तपणे उपबंधित केलेले नसल्यास, निरसित अधिनियमाखाली किंवा विनियमाखाली [2][केलेली किंवा] पुर:सृत केलेली कोणतीही [3][नियुक्ती, अधिसूचना], आदेश, योजना, नियम, प्रपत्र, किंवा उपविधि हे जेथवर पुन्हा अधिनियमित केलेल्या उपबंधाशी ते विसंगत नाहीत तेथबर अंमलात असण्याचे चालू राहील, आणि ते याप्रमाणे पुन्हा अधिनियमित झालेल्या उपबंधाखाली [2][केलेली किंवा] पुर:सृत केलेली कोणतीही [3][नियुक्ती, अधिसूचना] आदेश, योजना, नियम, प्रपत्र किंवा उपविधि यामुळे अधिभावित न झाल्यास, ते याप्रमाणे पुन्हा अधिनियमित झालेल्या उपबंधाखाली [2][केले किंवा] पुर:सृत केले असल्याचे मानले जाईल [4][आणि जेव्हा] अनुसूचित जिल्हे अधिनियम, १८७४ याच्या कलम ५ किंवा ५क खाली किंवा कोणत्याही तत्सम विधिखाली एखाद्या स्थानिक क्षेत्रावर विस्तारित करण्यात आलेला कोणताही [1][केंद्रीय अधिनियम] किंवा विनियम नंतरच्या अधिसूचनेद्वारे अशा क्षेत्रातून किंवा त्याच्या कोणत्याही भागातून मागे घेण्यात येऊन त्यावर पुन्हा विस्तारित करण्यात आला असेल तेथे, अशा अधिनियमाचे किंवा विनियमाचे उपबंध, या कलमाच्या अर्थान्वये अशा क्षेत्रात किंवा भागात निरसित करण्यात येऊन पुन्हा अधिनियमित करण्यात आले असल्याचे मानले जाईल.]

## संकीर्ण

द्रव्यदंडाची वसुली.

२५. भारतीय दंड संहिता (१८६० चा ४५) याची कलमे ६३ ते ७० आणि द्रव्यदंडाच्या वसुलीसाठी अधिपत्रे काढणे व त्याची अंमलबजावणी करणे यासंबंधीचे [5][फौजदारी प्रक्रिया संहिता (१८९८ चा ५)] याचे त्या त्या काळी अंमलात असलेले उपबंध हे, कोणत्याही अधिनियमाखाली विनियमाखाली, नियमाखाली किंवा उपविधिखाली लादलेल्या सर्व द्रव्यदंडांना, त्या अधिनियमात, नियमात किंवा उपविधित व्यक्तपणे विरुद्ध उपबंध अंतर्भूत नसेल तर, लागू होतील.

दोन किंवा त्याहून जास्त अधिनियमितींखाली शिक्षापात्र असलेल्या अपराधांबाबत उपबंध.

२६. जेथे एखादी कृती किंवा अकृती दोन किंवा त्याहून अधिक अधिनियमितीखाली अपराध ठरत असेल तेथे, तो अपराधी या दोहोंपैकी किंवा सर्वांपैकी कोणत्याही अधिनियमितीखाली अभियोगास आणि शिक्षेस पात्र असेल, पण त्याच अपराधाबद्दल दोनदा शिक्षा होण्यास पात्र असणार नाही.

डाकेने बजावणी याचा अर्थ.

२७. जेथे कोणताही दस्तऐवज डाकेने बजावणे—मग "बजावणे" हा शब्दप्रयोग केलेला असो वा "देणे" किंवा "पाठविणे" यां दोहोंपैकी कोणताही शब्दप्रयोग असो वा अन्य कोणताही शब्दप्रयोग असो—हे या अधिनियमाच्या प्रारंभानंतर केल्या जाणाऱ्या कोणत्याही [1][केंद्रीय अधिनियमाद्वारे] किंवा विनियमाद्वारे प्राधिकृत किंवा आवश्यक करण्यात येईल तेथे,—वेगळा उद्देश दिसून न आल्यास, दस्तऐवज अंतर्भूत असलेले पत्र योग्य पत्ता घालून व आगाऊ हशील भरून, नोंदणी डाकेने ते डाकेत टाकले की, ती बजावणी झाली, आणि विरुद्ध शाबीत झाले नाही तर, डाकेच्या सामान्य व्यवहारक्रमांनुसार त्या पत्राचा बटवडा ज्या वेळी होऊ शकतो त्या वेळेस ती बजावणी झाली, असे मानण्यात येईल.

अधिनियमितीचा उल्लेख करणे.

२८. (१) कोणत्याही [1][केंद्रीय अधिनियमात] किंवा विनियमात आणि अशा कोणत्याही अधिनियमाखाली किंवा विनियमाखाली अथवा अशा कोणत्याही अधिनियमाला किंवा विनियमाला अनुलक्षून केलेला कोणताही नियम, उपविधि, संलेख किंवा दस्तऐवज यात कोणत्याही अधिनियमितीचा उल्लेख वा तिला दिलेल्या नावाचा किंवा (असल्यास) संक्षिप्त नावाचा निर्देश करून अथवा त्याचा क्रमांक व वर्ष यांचा निर्देश करून करता येईल आणि एखाद्या अधिनियमितीतील कोणत्याही उपबंधाचा उल्लेख, तो उपबंध त्या अधिनियमितीतील ज्या कलमात किंवा पोटकलमात असेल त्याचा निर्देश करून करता येईल.

---

१. विधि अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "गव्हर्नर जनरल-इन-कौन्सिलचा अधिनियम" या शब्दोल्लेखांऐवजी "केंद्रीय अधिनियम" हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला.

२. १९०३ चा अधिनियम १, कलम ३ व अनुसूची दोन द्वारे समाविष्ट करण्यात आले.

३. १९१४ चा अधिनियम १७, कलम २ व अनुसूची एक द्वारे समाविष्ट करण्यात आले.

४. विधि अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे निरसित.

५. पहा, फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ (१८९८ चा ५) कलम ३८६.

(२) या अधिनियमात आणि या अधिनियमाच्या प्रारंभानंतर केल्या जाणाऱ्या कोणत्याही [१][केंद्रीय अधिनियमात] किंवा विनियमात दुसऱ्या एखाद्या अधिनियमितीच्या एखाद्या भागाचे वर्णन किंवा उल्लेख याचा अर्थ, वेगळा उद्देश दिसून न आल्यास, वर्णनात किंवा उल्लेखात समाविष्ट असलेल्या भागाच्या सुरुवातीचा म्हणून किंवा अखेरचा म्हणून ज्या शब्दाचा, कलमाचा किंवा अन्य भागाचा उल्लेख किंवा निर्देश केलेला असेल तो त्या वर्णनात किंवा उल्लेखात समाविष्ट आहे, असा मानला जाईल.

**पूर्वीच्या अधिनियमिती, नियम आणि उपविधी यांचे संरक्षण.**

**२९.** या अधिनियमाच्या प्रारंभानंतर केले जाणारे अधिनियम, विनियम, नियम किंवा उपविधि यांचा अर्थ लावण्याबाबतचे या अधिनियमातील उपबंध हे, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी केलेला कोणताही अधिनियम, विनियम, नियम किंवा उपविधि या अधिनियमाच्या प्रारंभानंतर केलेल्या अधिनियमाद्वारे, विनियमाद्वारे, नियमाद्वारे किंवा उपविधिद्वारे चालू ठेवण्यात आला किंवा विशोधित करण्यात आला तरी, पूर्वीच्या त्या अधिनियमाचा, विनियमाचा, नियमाचा किंवा उपविधिचा अर्थ लावण्यावर परिणाम करणार नाहीत.

**अध्यादेशांना अधिनियम लागू असणे.**

[२][**३०.** या अधिनियमात कलम ५ खेरीज करून जेथे जेथे [१][केंद्रीय अधिनियम] हा शब्दप्रयोग आला आहे तेथे तेथे त्यास आणि कलम ३ चे [३][खंड (९), (१३), (२५), (४०), (४३), (५२) व (५४)] आणि कलम २५ यामधील "अधिनियम" या शब्दात "इंडियन कौंसिल ॲक्ट, १८६१ (व्हीक्टो, २४ व २५—प्र. ६७) कलम २३ [४][अथवा "गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट, १९१५ पंचम जॉ. ५ व ६ प्र. ६१) कलम ७२] [५][अथवा गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट, १९३५" (पंचम जॉ. २६ प्र. २) कलम ४२ [६][ * * *] या खाली गव्हर्नर जनरलने केलेल्या आणि प्रख्यापित केलेल्या अध्यादेशाचा [७][आणि संविधानाच्या अनुच्छेद १२३ खाली राष्ट्रपतीने प्रख्यापित केलेल्या अध्यादेशाचा] समावेश असल्याचे मानण्यात येईल.]

**३०क.** [८][गव्हर्नर जनरलने केलेल्या अधिनियमांना हा अधिनियम लागू असणे.] अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे निरसित.

[९][**३१.** प्रांतांच्या स्थानिक सरकारच्या निर्देशांचा अर्थ लावणे.] अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे निरसित.

**अनुसूची.**—[निरसित अधिनियमिती.] विशोधन अधिनियम, १९०३ (१९०३ चा १), कलम ४ व अनुसूची तीन द्वारे निरसित.

---

१. विधि अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "गव्हर्नर जनरल-इन-कौंसिलचा अधिनियम" या शब्दोल्लेखाऐवजी "केंद्रीय अधिनियम" हा शब्दोल्लेख दाखल करण्यात आला.

२. १९१४ चा अधिनियम, १७, कलम २ व अनुसूची एक याद्वारे समाविष्ट करण्यात आले.

३. विधि अनुकूल आदेश, १९५० द्वारे खंड (९), (१२), (३८), (४८) व (५०) या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. १९१७ चा अधिनियम २४, कलम २ व अनुसूची एक यांद्वारे समाविष्ट करण्यात आले.

५. विधि अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

६. विधि अनुकूलन आदेश, १९४७ द्वारे, "किंवा कलम ४३" हा मजकूर गाळण्यात आला.

७. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे समाविष्ट करण्यात आले.

८. १९२३ चा अधिनियम २, कलम २ व अनुसूचीद्वारे समाविष्ट करण्यात आले.

९. १९२० चा अधिनियम ३१, कलम २ व अनुसूचीद्वारे समाविष्ट करण्यात आले.

(शा.म.मु.) एच ४०२४—४ (१०३५—३--०७)

# THE GENERAL CLAUSES ACT, 1897

## सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८९७

इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| abet | अपप्रेरणा देणे | [S. 3 (1)] |
| Act | अधिनियम | [S. 3 (29)] |
| adopted son | दत्तक पुत्र | [S. 3 (57)] |
| adoptive father | दत्तक पिता/बाप | [S. 3 (20)] |
| affidavit | प्रतिज्ञालेख | [S. 3 (3)] |
| affirmation | दृढकथन | [S. 3 (7)] |
| allowed | अनुज्ञात | [S. 3 (62)] |
| by-law | उपविधि | [S. 3 (29)] |
| Chief controlling Revenue Authority | मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकरण | [S. 3 (10)] |
| civil wrong | दिवाणी अपकृती | [S. 3 (2)] |
| code | संहिता | [S. 3 (19)] |
| codicil | क्रोडपत्र | [S. 3 (64)] |
| cognate | सजातीय | [S. 3 (62)] |
| computation of time | कालगणना | [S. 10 (m.n.)] |
| conclusive proof | निर्णायक पुरावा | [S. 23 (5)] |
| concurrence | सहमती | [S. 23 (1)] |
| contains an express provision to the contrary | व्यक्तपणे विरुद्ध उपबंध अंतर्भूत नसेल तर | [S. 25] |
| corporation | निगम | [S. 18 (1)] |
| correspondance | समनुरूप | [S. 3 (60)(a)] |
| draft | प्रारूप | [S. 23 (1)] |
| declaration | अधिकथन | [S. 3 (3)] |
| dismiss | पदच्युत | [S. 16] |
| effective | परिणामक | [S. 22] |
| enactment | अधिनियमिती | [S. 3 (19)] |
| express | व्यक्त | [S. 6 (a)] |
| fastened things | जखडलेल्या वस्तू | [S. 3 (26)] |
| forfeiture | समपहरण | [S. 6 (e)] |
| Government securities | सरकारी रोखे | [S. 3 (28)] |
| grammatical variation | व्याकरणिक रूपभेद | [S. 3 (62)] |
| honesty | प्रामाणिकपणा | [S. 3 (22)] |
| horizontal plane | क्षैतिज समतल | [S. 11] |
| illegal omission | अवैध अकृती | [S. 3 (2)] |

| | | |
|---|---|---|
| immovable property | स्थावर मालमत्ता | [S. 3 (26)] |
| imprisonment | कारावास | [S. 3 (27)] |
| Indian State | भारतीय संस्थान | [S. 3 (30)] |
| in fact | वस्तुतः | [S. 3 (22)] |
| in good faith | सद्भावपूर्वक | [S. 3 (22)] |
| instrument | संलेख | [S. 3 (29)] |
| intention | उद्देश | [S. 3 (18)] |
| investigation | अन्वेषण | [S. 6 (e)] |
| issue | पुरःसृत | [S. 20 (m.n.)] |
| leviable | आकारणीयोग्य | [S. 12] |
| legally entitled | विधितः हक्कदार | [S. 3 (31)] |
| legal proceeding | वैध कार्यवाही | [S. 6 (e)] |
| legislative capacity | विधायी अधिकार | [S. 3 (7)(b)] |
| liability | दायित्व | [S. 6 (e)] |
| lithograph | शिलामुद्रण | [S. 3 (65)] |
| local authority | स्थानिक प्राधिकरण | [S. 3 (31)] |
| local fund | स्थानिक निधी | [S. 3 (31)] |
| magistrate | दंडाधिकारी | [S. 3 (32)] |
| matter | मजकूर | [S. 6 (a)] |
| means | साधने | [S. 3 (18)] |
| modification | आपरिवर्तन | [S. 8 (1)] |
| movable property | जंगम मालमत्ता | [S. 3 (36)] |
| negligence | हयगय | [S. 3 (22)] |
| obligation | आबंधन | [S. 6 (e)] |
| official title | पदाभिधान | [S. 17 (1)] |
| omission | अकृती | [S. 26] |
| order | आदेश | [S. 3 (29)] |
| ordinance | अध्यादेश | [S. 3 (29)] |
| ordinary course | सामान्य व्यवहार | [S. 27] |
| original jurisdiction | मूळ अधिकारिता | [S. 3 (17)] |
| pass | पारित | [S. 6 (e)] |
| penalty | शास्ती | [S. 6 (e)] |
| perpetual succession | निरंतर परंपरा | [S. 18 (1)] |
| personal law | व्यक्तिविषयक विधि | [S. 3 (19)] |
| port commissioner | बंदर आयुक्त | [S. 3 (31)] |
| possession | कब्जातील मुलूख | [S. 3 (5)] |
| posthumous | मरणोत्तर | [S. 3 (64)] |

| | | |
|---|---|---|
| pre-paying | आगाऊ हशील | [S. 27] |
| previous operation | पूर्वप्रवर्तन | [S. 6 (b)] |
| printing | मुद्रण | [S. 3 (65)] |
| privilege | विशेषाधिकार | [S. 6 (e)] |
| proposed rules | नियोजित नियम | [S. 23 (1)] |
| prosecution | अभियोग | [S. 26] |
| province | प्रांत | [S. 3 (8)(a)(i)] |
| provincial Government | प्रांतिक सरकार | [S. 3 (8)(a)(i)] |
| public nuisance | सार्वजनिक उपद्रव | [S. 3 (48)] |
| punishable | शिक्षापात्र | [S. 26 (m.n.)] |
| punishment | शिक्षा | [S. 6 (e)] |
| remedy | उपाय | [S. 6 (e)] |
| rescind | विखंडन | [S. 21] |
| right | हक्क | [S. 6 (e)] |
| rule | नियम | [S. 3 (29)] |
| scope | व्याप्ती | [S. 3 (60)(c)] |
| substitution | प्रतिनिधान | [S. 17 (m.n.)] |
| successor | उत्तराधिकारी | [S. 18 (m.n.)] |
| supersede | अधिभावित | [S. 24] |
| suzerain | वर्चस्व | [S. 3 (28)(a)] |
| territory | राज्यक्षेत्र | [S. 3 (28)(a)] |
| things attached to the earth | भूबद्ध वस्तू | [S. 3 (26)] |
| to operate | प्रवर्तन करणे | [S. 5 (1)] |
| to promulgate | प्रख्यापित करणे | [S. 30] |
| to represent | आविष्कृत होणे | [S. 3 (65)] |
| to serve by post | डाकेने बजावणे | [S. 27] |
| to vary | बदल करणे | [S. 21] |
| union territory | संघ राज्यक्षेत्र | [S. 3 (8)(b)(iii)] |
| unless the contrary | विरुद्ध शाबीत झाले नाही तर | [S. 27] |
| vessel | जलयान | [S. 3 (55)] |
| virtue of office | पदाधिकार परत्वे | [S. 15] |
| voluntarily | स्वेच्छापूर्वक | [S. 3 (64)] |
| warrant | अधिपत्र | [S. 25] |
| wholly | संपूर्णतः | [S. 7 (1)] |

## सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८९७

# THE GENERAL CLAUSES ACT, 1897

### मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अकृती | omission | [क़, २६] |
| अधिकथन | declaration | [क. ३ (३)] |
| अधिनियम | Act | [क. ३ (२९)] |
| अधिनियमिती | enactment | [क. ३ (१९)] |
| अधिपत्र | warrant | [क. २५] |
| अधिभावित | supersede | [क. २४] |
| अध्यादेश | ordinance | [क. ३ (२९)] |
| अनुज्ञात | allowed | [क. ३ (६२)] |
| अन्वेषण | investigation | [क. ६ (ङ)] |
| अपप्रेरणा देणे | abet | [क. ३ (१)] |
| अभियोग | prosecution | [क. २६] |
| आविष्कृत होणे | to represent | [क. ३ (६५)] |
| अवैध अकृती | illegal omission | [क. ३ (२)] |
| आकारणीयोग्य | leviable | [क. १२] |
| आगाऊ हशील | pre-paying | [क. २७] |
| आदेश | order | [क. ३ (२९)] |
| आपरिवर्तन | modification | [क. ८ (१)] |
| आबंधन | obligation | [क. ६ (ङ)] |
| उत्तराधिकारी | successor | [क. १८ (स.टी.)] |
| उद्देश | intention | [क़. ३ (१८)] |
| उपविधि | bye-law | [क. ३ (२९)] |
| उपाय | remedy | [क. ६ (ङ)] |
| कब्जातील मुलूख | possession | [क. ३ (५)] |
| कारावास | imprisonment | [क. ३ (२७)] |
| कालगणना | computation of time | [क. १० (स.टी.)] |
| क्रोडपत्र | codicil | [क. ३ (३४)] |
| क्षैतिज समतल | horizontal plane | [क. ११] |
| जखडलेल्या वस्तू | fastened things | [क. ३ (२६)] |
| जलयान | vessel | [क. ३ (५५)] |
| जंगम मालमत्ता | movable property | [क. ३ (३६)] |
| डाकेने बजावणे | to serve by post | [क. २७] |
| दत्तक पिता/बाप | adoptive father | [क. ३ (२०)] |
| दत्तक पुत्र | adopted son | [क़. ३ (५७)] |
| दायित्व | liability | [क. ६ (ङ)] |

| | | |
|---|---|---|
| दिवाणी अपकृती | civil wrong | [क. ३ (२)] |
| दृढकथन | affirmation | [क. ३ (३)] |
| दंडाधिकारी | magistrate | [क. ३ (३२)] |
| निगम | corporation | [क. १८ (१)] |
| नियम | rule | [क. ३ (२९)] |
| नियोजित नियम | proposed rules | [क. २३ (१)] |
| निर्णायक पुरावा | conclusive proof | [क. २३ (५)] |
| निरंतर परंपरा | perpetual succession | [क. १८ (१)] |
| पदच्युत | dismiss | [क. १६] |
| पदाधिकार परत्वे | virtue of office | [क. १५] |
| पदाभिधान | official title | [क. १७ (१)] |
| परिणामक | effective | [क. २२] |
| पारित | pass | [क. ६ (ङ)] |
| पुरःसृत | issue | [क. २० (स.टी.)] |
| पूर्वप्रवर्तन | previous operation | [क. ६ (ख)] |
| प्रख्यापित करणे | to promulgate | [क. ३०] |
| प्रतिज्ञालेख | affidavit | [क. ३ (३)] |
| प्रतिनिधान | substitution | [क. १७ (स.टी.)] |
| प्रवर्तन करणे | to operate | [क. ५ (१)] |
| प्रामाणिकपणा | honesty | [क. ३ (२२)] |
| प्रारुप | draft | [क. २३ (१)] |
| प्रांत | province | [क. ३ (८)(क)(एक)] |
| प्रांतिक सरकार | provincial government | [क. ३ (८)(क)(एक)] |
| बदल करणे | to vary | [क. २१] |
| बंदर आयुक्त | port commissioner | [क. ३ (३१)] |
| भारतीय संस्थान | Indian state | [क. ३ (३०)] |
| भूबद्ध वस्तू | things attached to the earth | [क. ३ (२६)] |
| मजकूर | matter | [क. ६ (क)] |
| मरणोत्तर | posthumous | [क. ३ (६४)] |
| मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकरण | Chief Controlling Revenue Authority | [क. ३ (१०)] |
| मुद्रण | printing | [क. ३ (६५)] |
| मूळ अधिकारिता | original jurisdiction | [क. ३ (१७)] |
| राज्यक्षेत्र | territory | [क. ३ (३८)(क)] |
| वर्चस्व | suzerain | [क. ३ (२८)(क)] |
| वस्तुतः | infact | [क. ३ (२२)] |
| विखंडन | rescind | [क. २१] |

| | | |
|---|---|---|
| विधायी अधिकार | legislative capacity | [क. ३ (७)(ख)] |
| विधितः हक्कदार | legally entitled | [क. ३ (३१)] |
| विरुद्ध शाबीत झाले नाही तर | unless the contrary is proved | [क. २७] |
| विशेषाधिकार | privilege | [क. ६ (ङ)] |
| वैध कार्यवाही | legal proceeding | [क. ६ (ङ)] |
| व्यक्त | express | [क. ६ (क)] |
| व्यक्तपणे विरुद्ध उपबंध अंतर्भूत नसेल तर | contains an express provision to the contrary | [क. २५] |
| व्यक्तिविषयक विधि | personal law | [क. ३ (१९)] |
| व्याकरणिक रूपभेद | grammatical variation | [क. ३ (६२)] |
| व्याप्ती | scope | [क. ३ (६०)(ग)] |
| शास्ती | penalty | [क. ६ (ङ)] |
| शिक्षा | punishment | [क. ६ (ङ)] |
| शिक्षापात्र | punishable | [क. २६ (स.टी.)] |
| शिलामुद्रण | lithograph | [क. ३ (६५)] |
| सजातीय | cognate | [क. ३ (६२)] |
| सद्भावपूर्वक | in good faith | [क. ३ (२२)] |
| समनुरूप | correspondance | [क. ३ (६०)(क)] |
| समपहरण | forfeiture | [क. ६ (ङ)] |
| सरकारी रोखे | Government securities | [क. ३ (२४)] |
| सहमती | concurrence | [क. २३ (१)] |
| साधने | means | [क. ३ (१८)] |
| सामान्य व्यवहार | ordinary course | [क. २७] |
| सार्वजनिक उपद्रव | public nuisance | [क. ३ (४८)] |
| संघ राज्यक्षेत्र | union territory | [क. ३ (८)(ख)(तीन)] |
| संपूर्णतः | wholly | [क. ७ (१)] |
| संलेख | instrument | [क. ३ (२९)] |
| संहिता | code | [क. ३ (१९)] |
| स्थानिक निधी | local fund | [क. ३ (३१)] |
| स्थानिक प्राधिकरण | local authority | [क. ३ (३१)] |
| स्थावर मालमत्ता | immovable property | [क. ३ (२३)] |
| स्वेच्छापूर्वक | voluntarily | [क. ३ (६४)] |
| हक्क | right | [क. ६ (ङ)] |
| हयगय | negligence | [क. ३ (२२)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई